# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १५.०८.२०२६ शनिवार**

**नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत ध्वजारोहन कार्यक्रम संपन्न :—**

आज दिनांक १५.०८.२०२६ रोजी ०८:०० वा पोलीस भवन सिव्हील लाईन, नागपुर येथे ८० वे स्वातंत्र्य दिनानिमीत्य मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे हस्ते ध्वजारोहन कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या,

मा. पोलीस आयुक्त यांनी याप्रसंगी नागपुर शहर व नागपुर ग्रामीण पोलीस दलातील राष्ट्रपती पदकासाठी निवड करण्यात आलेल्या १) श्री. वैभवकुमार गागदेव जाधव, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा २) श्री राजकुमार यादवराव जनबंधु, पोहवा, पोलीस ठाणे कपीलनगर तसेच, मा. भारत सरकार, गृहमंत्रालय यांचे अतिउत्कृष्ट सेवापदक प्राप्त १) मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, २) मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), ३) मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहायक पोलीस आयुक्त, अजनी विभाग, ४) श्री महेश आंधळे, पोलीस निरीक्षक, नवीन कामठी, ५) श्री. नरेंद्र गोरखेडे, सपोनि. वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण, ६) श्री राजेश तुकाराम पैदलवार, पोलीस उपनिरीक्षक, गुन्हेशाखा ७) श्री सुनिल गोपीनाथ जाधव, पोउपनि. वाहतुक शाखा, ८) श्री. बट्टुलाल पांडे, पोउपनि. स्थानिक गुन्हेशाखा, नागपुर ग्रामीण ९) श्री किशोर माणिकराव मालोकर, पोउपनि, बेलतरोडी, १०) श्री. विजय खुशालराव पंचभाई, सफौ. वाहतुक शाखा ११) श्री. अनिल संतोषराव तुमसरे, सफौ. पो.ठा. भांडेवाडी, १२) श्री. दिनकर वासुदेव चांभारे, पोहवा. पो. मुख्यालय, १३) श्री. नितीन काशीराम वानखेडे, पोहवा. विशेष शाखा, १४) श्री. सचिन तुळशिराम मांडळे, पोहवा. विशेष शाखा, १५) श्री. पंकज पुरूषोत्तम धांदे, पोहवा. गुन्हेशाखा तसेच, मा. भारत सरकार, गृहमंत्रालय यांचे उत्कृष्ट सेवापदक प्राप्त १) श्री. मुकुंद सुखदेवराव कवाडे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, लकडगंज २) श्री. ज्ञानेश्वर मुकुंदराव भेदोडकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सदर, ३) श्री रितेश रत्नाकर आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, बेलतरोडी, ४) श्री. प्रमोद घोंगे, पोनि. जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण ५) श्री. चंद्रकांत काळे, पोनि. खापा, नागपुर ग्रामीण, ६) श्री निलेश चंद्रकांत घोगरे, पोउपनि. कळमना, ७) श्री विजय वसंतराव कुंभलकर, पोहवा. पो. मुख्यालय, ८) श्री रविंद्र विश्वनाथ घुर्रे, पोहवा. पो. मुख्यालय ९) श्री विजय तुकाराम लोनबळे, पोहवा. पो. नियंत्रण कक्ष १०) श्री रत्नाकर शामलाल वलके, पोहवा. आर्थिक गुन्हेशाखा ११) श्री. कमलाकर गुलाब भंगाळे, पोहवा. विशेषशाखा १२) श्री. विजय हरीचंद्र वाडे, पोहवा. बिडीडीएस शाखा, १३) श्री. रविंद्र विठोबा खिराडे, पोहवा. बिनतारी संदेश विभाग १४) श्री. सचिंद्र त्र्यंबकराव चौधरी, पोहवा. गुन्हेशाखा, १५) श्रीमती वैशाली भास्करराव शेंद्रे, मपोहवा. एमआयडीसी, १६) श्री. हर्षदीप बैजनाथ खोब्रागडे, पोहवा. तहसिल, १७) श्री. सचिन मोरेश्वर ठोंबरे, पोहवा. पो. मुख्यालय, १८) श्री. अरूणकुमार लल्लुराम भारती, पोहवा. पो. मुख्यालय, १९) श्री. अजय तिवारी, पोहवा. सायबर, नागपुर ग्रामीण, २०) श्री. रत्नाकर ठाकरे, चापोहवा. उपवि.कार्यालय, काटोल, नागपुर ग्रामीण, २१) श्री. मंगेश शिवकुमार मापारी, पोअं. गुन्हेशाखा, नागपुर शहर तसेच, मा. पोलीस महासंचालक यांचे विशेष सेवापदक प्राप्त १) श्री. नितीन अशोक मगर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वाडी २) श्री. निलेश बकाराम उरकुडे, सहा. पोलीस

निरीक्षक, अंबाझरी आणि मा. पोलीस महासंचालक यांचे खडतर सेवापदक हे श्री. नितीन मधुकर अवधुत, पोलीस उपनिरीक्षक, डॉग युनिट अशा सर्वांचे पुष्पगुच्छ तसेच मेडल प्रदान करून सत्कार व अभिनंदन केले.

कार्यक्रमास मा. सह पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री. राजेन्द्र दाभाडे, श्री. वसंत परदेशी, श्रीमती विनीता शाहु त्याचप्रमाणे नागपुर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार आणि नागपुर शहरातील सर्व पोलीस उप–आयुक्त, सहा. पोलीस आयुक्त व सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, नागरीक, विद्यार्थी, पोलीस आयुक्तालयातील सर्व कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी त्याचप्रमाणे मिडीयाचे प्रतीनिधी उपस्थित होते.






**(कामगिरी)**

**<u>१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–</u>**

दिनांक १४.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ४९ केसेसमध्ये ५२ ईसमावर कारवाई करून एकुण १५,०३,७८३/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये २५ इसमांवर कारवाई करुन १५,१२,२८२/–रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३७१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,११,७००/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १४.०८.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक १५.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०१** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक १४.०८.२०२६ चे २०.१० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, राजीव नगर, ईसासनी रोड, स्मशानघाटाजवळील देशी दारू भट्टी जवळ एक इसम लोकांना शिवीगाळी करून धुमधाम करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम लाकडी दांड्यासह दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लाकडी दांडा काढुन घेतला. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निलेश उर्फ गजनी शिलानाथ शहा, वय २८ वर्षे, रा. शुभम नगर वस्ती, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२५ दिनांक २४.०४.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने व धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. गोकुळ महाजन यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा. राजेश वरठी, ईस्माईल नवरंगाबादे, पोअं. मनोज सोनवणे यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.</u>**

दिनांक ०९.०८.२०२६ चे २०.२० ते दि. १०.०८.२०२६ चे ०८.२० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे मोठे भाऊ नामे सुधिर महेंद्रप्रसाद द्वीवेदी, वय ३३ वर्षे, रा. गजानन नगर, मुन्ना पटेलचे घरी किरायाने, हिंगणा रोड, एमआयडीसी, नागपुर हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत, राजीव नगर मेन रोड, हिंगणा—नागपुर रोडवरील विद्युत खांबाजवळ मृत अवस्थेत मिळुन आल्याने, फिर्यादी सुखेंद्रकुमार महेंद्रप्रसाद द्वीवेदी, वय ३० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आलेली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीमध्ये शव विच्छेदन अहवालामध्ये मृतकाचा अनैसर्गिक मृत्यु झाल्याचे अभिप्राय प्राप्त झाला. तसेच, मृतक याची पत्नी सौ. पुजा सुधीर द्वीवेदी, वय २२ वर्षे हिचे मृतकचा मित्र आशिषकुमार नरेशकुमार अग्नीहोत्री, वय २९ वर्षे, रा. मिश्रा चे घरी किरायाने, आनंद बुध्द विहार जवळ, गजानन नगर, एमआयडीसी, नागपुर याचेसोबत प्रेमसंबंध असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे मोबाईल फोनवरून तांत्रीक तपास करून, चौकशी केली असता, मृतकाची पत्नी व तीचा मित्र आशिषकुमार यांनी संगणमत करून, मृतकाचे राहते घरी मृतकास दारू पाजुन, नशेत त्यास लोखंडी रॉडने कपाळावर मारले तसेच, ओढणीने नाक, तोंड दाबुन त्यास जिवानिशी ठार केले. व त्याचे प्रेत घटनास्थळी आणुन टाकले व तेथे अर्धवट दारूची बॉटल ठेवुन अपघाताचा बनाव केल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही आरोपींनी त्यांचे जुने सिमकार्ड जाणीवपुर्वक बंद करून, नविन सिमचा उपयोग केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोउपनि. सागर गायकवाड यांनी चौकशीअंती दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. अक्षय गवांदे यांनी दोन्हीही आरोपीविरुध्द कलम १०३(१),६१,३(५) भान्यास.

अन्वये गुन्हा नोंद केला असून, आरोपी आशिषकुमार नरेशकुमार अग्नीहोत्री यास अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :– गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १४.०८.२०२६ चे १७.२५ वा. ते १८.४५ वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, टेका वस्ती, आझाद नगर, चिराग अली चौक, नाल्याजवळील शेडमध्ये गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे ०७ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, जनावरे हे पाहीजे आरोपी नामे फिरोज खान लतीक खान कुरैशी, वय ४३ वर्षे, रा. मक्का मस्जीद मागे, टेका नविन वस्ती, पाचपावली याचे मालकीचे असुन, आरोपीने गोवंशीय जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०७ गोवंशीय जनावरे व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे २,४०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. नरेश पंडीत यांनी आरोपीविरूध्द कलम ५,५(ब),(क),९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम–१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(च)(छ) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १२वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०००५९ /२०१४ | कलम ५०९, २९४ भा.दं.वि. | सचिन गंगाधर ठाकरे रा. चक्की खापा, भोसला मिलीट्री शाळे जवळ, कारोडी, नागपुर | १८.०८.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ०६, नागपुर.. | ३०२२४० /२००६ | कलम ३२४, ५०४ भा.दं.वि. | राजु ईश्वर बाबरीया रा. हंसापुरी, तहसील नागपुर | १७.०८.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ०६, नागपुर.. | ३०३२७२ /२००६ | कलम ३२४ भा.दं.वि. | चिंदबाजी महादेव इंगळे रा. गोधनी रेल्वे, पोलीस पाटील चे घरामागे, कोराडी, नागपुर | १७.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**